E - 2826

# आरोग्य सेवा आयुक्तालय

**( महाराष्ट्र राज्य )**

"आरोग्य भवन", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, मुंबई ४००००१

| कार्यालय | दूरध्वनी | |
|---|---|---|
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१००६ | Website: http://arogya.maharashtra.gov.in |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६२११८६ | Email: aodhs2239@gmail.com |
| | | Fax No. ०२२-२२६२१०३४ / २२६२०२३४ (DHS) |


जा.क्र.संआसे/२अ/टे७/ऑनलाईननियुक्ती/जा.क्र 972-1049 /२०२३

दिनांक- 10/4/२०२३

प्रति,

जिल्हा शल्यचिकित्सक (सर्व)

जिल्हा आरोग्य अधिकारी ( सर्व)

अ.१.९

सांगली जिल्हा परिषद, सांगली.
आरोग्य विभाग
जावक क्र:-
10 APR 2023
अधिपत्रक क.अ. प्र.अ.
अति.जि.आ.अ. जि.आ.अ.

विषय- कंत्राटी/तदर्थ वैद्यकीय अधिकारी कार्यरत असणाऱ्या ठिकाणी बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी यांच्या ऑनलाईन नियुक्ती डीएमईआर पोर्टल मार्फत न देण्याबाबत

संदर्भ- National intergrated medical association, contractual medical officers group-A forum Out.No.n.i.m.a./c.m.o.f./MSB/GS/२०२१-२३ दि.१०/०३/२०२३.

कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांनी दि.२८/०३/२०२३ रोजी मा. मंत्री, आरोग्य व कुटुंब कल्याण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे शासन निर्णय दिनांक ०४/०७/२०१९ चा अवमान होत असल्याबाबत तक्रार अर्ज सादर केला आहे.सदर तक्रार अजार्वर मा.मुख्यमंत्री महोदय यांनी प्रधान सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांना पुढील आदेशापर्यंत स्थगिती देवून अहवाल त्वरीत सादर करण्याबाबत निर्देश दिले आहेत. ( तक्रार अर्जाची प्रत संलग्न)

प्रस्तुत प्रकरणी सादर करण्यात येते की, शासन निर्णय दिनांक ०४/०७/२०१९मध्ये सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत (प्राथमिक आरोग्य केंद्रात ) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ या संवर्गातील रिक्त पदे नियमीत वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने एम.बी.बी.एस अर्हताधारकांमधुन प्राधान्याने भरण्यात यावीत. त्यानंतरही सदर पदे रिक्त राहत असल्यास, ती पदे बी.ए.एम.एस अर्हताधारकांमधुन त्या ठिकाणी नियमीत अथवा कंत्राटी एम.बी.बी.एस. अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी मिळेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तेवढया कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरण्यात यावीत. सदर शासन निर्णयात महाराष्ट्र वैद्यकीय व

आरोग्य सेवा, गट-अ या संवर्गातील रिक्त पदे नियमीत वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबत नमूद नाही. त्यामुळे मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने आपणांस सुचित करण्यात येते की, कंत्राटी /तदर्थ वैद्यकीय अधिकारी कार्यरत असणाऱ्या ठिकाणी पुढील आदेश होईपर्यंत बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी यांच्या ऑनलाईन नियुक्तीसाठी सदर पदे रिक्त दर्शवू नयेत.

10-5

(डॉ. स्वप्निल लाळे)
संचालक,
आरोग्य सेवा, मुंबई

प्रत-उपसंचालक, आरोग्य सेवा (परिमंडळे सर्व) यांना माहितीस्तव